केंद्र पुरस्कृत माहिती तंत्रज्ञान व दळणवळण योजना (तिसरा टप्पा) या योजनेंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता निधी वितरीत करण्याबाबत..
केंद्र हिस्सा लेखाशिर्ष (२२०२ आय१९२) व राज्य हिस्सा लेखाशिर्ष (२२०२ आय२०९)

महाराष्ट्र शासन.
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी२०१८/प्र.क्र.४/कार्यासन.६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: ६ मार्च, २०१९

<u>वाचा -</u>

१) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ व दि.२५.०१.२०१९.
२) मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकारचे पत्र क्र. ७-८/२०१८-आयएस-१२ (एसटी), दि.३०.०१.२०१९
३) शालेय शिक्षण विभाग, नस्ती क्र. आयसीटी २०१४ /प्र.क्र.२५ (II) /एसडी-१.

शासन निर्णय :-

केंद्र पुरस्कृत माहिती तंत्रज्ञान व दळणवळण योजना (तिसरा टप्पा) या योजनेंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता मागणी क्र. टी-५, २२०२ , सर्वसाधारण शिक्षण, जनजाति क्षेत्र उपयोजना, ०२, माध्यमिक शिक्षण, ७९६ जनजाति क्षेत्र उपयोजना (०१) जनजाति क्षेत्र उपयोजना, (०१) (०८) शाळांमध्ये माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान कार्यान्वित करणे (६० टक्के केंद्र हिस्सा) लेखाशिर्ष (२२०२ आय १९२), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली रु.२१.३१ कोटी, तर त्यास समरुप राज्य हिस्सा म्हणून (०१) (०९) शाळांमध्ये माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान कार्यान्वित करणे (४० टक्के राज्य हिस्सा) लेखाशिर्ष (२२०२ आय २०९) ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली रु. १२.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पित आहे.

२. केंद्र शासनाने उपरोक्त योजनेंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता रु. ६९७.९६ लाख इतका निधी संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये वितरीत केला आहे. त्यानुषंगाने शालेय शिक्षण विभागाने वाचा क्र.३ येथील नस्तीवर प्रस्तावित केल्यानुसार या योजनेंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता (०१) (०८) शाळांमध्ये माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान कार्यान्वित करणे (६० टक्के केंद्र हिस्सा) लेखाशिर्ष (२२०२ आय १९२), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली रु.२९१.१९ लाख (अक्षरी रु.दोन कोटी,एक्यान्नव लाख, एकोणीस हजार फक्त), तर त्यास समरुप राज्य हिस्सा म्हणून (०१) (०९) शाळांमध्ये माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान कार्यान्वित करणे (४० टक्के राज्य हिस्सा) लेखाशिर्ष (२२०२ आय २०९) ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली रु. १९४.१२६६६ लाख (अक्षरी रु.एक कोटी, चौऱ्यान्नव लाख, बारा हजार, सहाशे सहासष्ट फक्त) इतका निधी प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

३. सदर निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे. नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार सदर निधी याच वर्षात खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर

आयुक्त, आदिवासी विकास; आदिवासी विकास विभाग व शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

४. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात विविध योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन शासनाला आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल.

५. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदीतुन आदिवासी उपयोजना क्षेत्रात पायाभूत सविधा निर्माण करण्याबाबतच्या तसेच वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात फक्त वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाने **वाचा** येथील क्रमांक १ येथे नमूद शासन परिपत्रकांन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५४/अर्थेपाय, दि.५ /०२/२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर शासन परिपत्रकांन्वये विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करण्याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दक्षता घ्यावी.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०५१७२६३००६२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2019.03.06 10:11:59 +05'30'

रविंद्र दि.औटे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ नागपूर/ अमरावती.
५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
६. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७. वित्त विभाग (अर्थ-१९) / (व्यय-१४) मंत्रालय, मुंबई
८. कार्यासन अधिकारी (कार्या.११) /निवडनस्ती, कार्यासन- ०६, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई